# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:31.03.2026** **वार: मंगळवार**

1. जनगणनेच्या प्रक्रियेला उद्यापासून देशभरात सुरुवात; पहिल्या टप्प्यात घर गणना आणि स्व-गणना
2. देशातील नक्षलवाद संपवण्यासाठी विविध यंत्रणांनी केलेल्या प्रयत्नांमुळे, आता प्रभावित भागांपर्यंत विकास पोहोचत असल्याची केंद्रीय गृहमंत्र्यांची लोकसभेत माहिती
3. माओवादाविरुद्ध लढा दिलेल्या सी-60 जवानांना विशेष पदक देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा
4. पीएनजी सुविधा उपलब्ध असलेल्या शहरांमध्ये तीन महिन्यांच्या आत पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे बंधनकारक आणि
5. राज्याच्या अनेक भागात अवकाळी पावसामुळे पिकांचं नुकसान; पुढील चार दिवसही पावसाची शक्यता

**<u>जनगणना</u>**

देशातील जनगणना 2027 ची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पहिला टप्पा उद्या म्हणजे 1 एप्रिलपासून सुरू होणार असून तो येत्या 30 सप्टेंबर पर्यंत सुरू राहणार आहे अशी माहिती जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार यांनी दिली आहे. याआधीची जनगणना 2011 मध्ये झाली होती.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा यांची माहिती घेतली जाणार आहे. नागरिकांना प्रथमच स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून, विशेष मोबाईल ॲप आणि पोर्टलच्या माध्यमातून घरी बसून माहिती भरता येणार आहे. हे पोर्टल 16 भाषांमध्ये उपलब्ध असेल. माहिती भरल्यानंतर नागरिकांना 11 अंकी 'AC ID' दिला जाईल.

दुसऱ्या टप्प्यात वैयक्तिक माहिती संकलित केली जाईल आणि संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात होणार आहे. तसेच या टप्प्यात जातीनिहाय गणनाही केली जाणार आहे.

**<u>अमित शहा</u>**

डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे प्रभावित भागांमधील विकासाला खीळ बसली होती, परंतु आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात या भागांपर्यंत विकास पोहोचत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. देश नक्षलवाद मुक्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवर लोकसभेत झालेल्या चर्चेला काल त्यांनी उत्तर दिलं. शस्त्र उचलणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असं शहा यांनी स्पष्ट केलं.....

**ये जो वकील बन रहे हैं एक हथियारी मूवमेंट के कहते हैं, हम अन्याय के खिलाफ लड़ेंगे। संविधान को मानोगे या नहीं मानोगे किसी को भी अन्याय होता है। इसका उपाय हमारे संविधान के अंदर निहित अदालतें बनी हैं, विधानसभाएं बनी हैं, जिला पंचायतें बनी हैं, तहसील पंचायत बनी है, कि पूरी व्यवस्था को नकार कर कर हाथ में हथियार उठा लोगे ऐसा कैसे चलेगा। और जस्टिफाई जो करे उनको मैं कहना चाहता हूं वो समय चला गया कि नरेन्द्र मोदी की सरकार है जो हथियार उठाएगा उसको हिसाब इस तरह से नहीं चलेगा।**

नक्षलग्रस्त 12 राज्यांमध्ये डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे 20 हजार लोकांचा मृत्यू झाला आणि जवळपास 12 कोटी लोक अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिले, असं शहा म्हणाले. नक्षलवाद नष्ट करून या भागात विकासची

गंगा पोहोचवण्यासाठी गेल्या 12 वर्षात केलेल्या विविध उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. 2024 ते मार्च 2026 या कालावधीत 706 नक्षलवादी चकमकीत ठार करण्यात आले, 2 हजार 218 नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली, तर 4 हजार 839 नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली, अशी माहिती त्यांनी दिली. नक्षलवादाविरुद्धच्या मोहिमेत प्राण गमावलेल्या जवानांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

**<u>पोलीस तपासात AI</u>**

माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. माओवादाची चळवळ आता राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी-60 मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-60 पदक' देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी काल केली. मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद झाली; त्यानंतर ते बोलत होते. गृह राज्यमंत्री पंकज भोयर, गृह राज्यमंत्री योगेश कदम, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी यावेळी उपस्थित होते. पोलीस तपासामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजे AI चा वापर वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही फडणवीस यांनी काल जाहीर केला. पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते आरोपपत्रापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>पीएनजी</u>**

पाइपद्वारे नैसर्गिक वायू  म्हणजे पीएनजी सुविधा उपलब्ध असलेल्या शहरांमध्ये नागरिकांनी तीन महिन्यांच्या आत पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे बंधनकारक असल्याची माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले....

**अनेक ठिकाणी जे आहे पीएनजी मिळण्याची व्यवस्था असताना सुद्धा अनेकांनी ते पीएनजी घेतलेलं नाही. तिथे तीन महिन्याच्या आत तुम्ही सगळ्यांनी जे आहे, मग घरगुती असतील कमर्शियल असतील कोणी असेल, त्यांनी अर्ज ताबडतोब करणं गरजेचं आहे. तीन महिन्यामध्ये या सगळ्या ठिकाणी जर पाईपलाईनचं काम नाही झालं समजा, पण तुम्ही अर्ज केलेला आहे, तर तुमचं एलपीजी बंद होणार नाही कारण तुमचा हेतू घेण्याचा आहे. पण तुम्ही अर्ज सुद्धा केला नाही त्यासाठी तर मात्र तीन महिन्यानंतर तुमचं एलपीजी बंद होऊ शकतं.**

राज्यात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलची कोणतीही टंचाई नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. काही ठिकाणी दिसणाऱ्या रांगा या भीतीपोटी झालेल्या खरेदीमुळे असल्याचे त्यांनी नमूद केलं आणि नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन केलं. नागरिकांमधील संभ्रम आणि भीती दूर करण्यासाठी स्वस्त धान्य दुकानांमधून तीन महिन्यांचे अन्नधान्य आगाऊ देण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच केरोसिनचे वाटपही सुरू करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>इलेक्ट्रॉनिक्स</u>**

इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादन योजनेअंतर्गत देशात एकंदर 61 हजार कोटी रुपयांच्या 75 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत दिली. या प्रकल्पांमुळे देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असून सुमारे 65 हजार थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. देशात आता सेमीकंडक्टर चिप्ससह तयार उत्पादनं, मॉड्यूल्स, सब-मॉड्यूल्स आणि इलेक्ट्रॉनिक्स घटकांचं उत्पादन सुरू झालं आहे असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>महावीर जयंती</u>**

जैन तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज देशभरात साजरी केली जात आहे. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांना, विशेषतः जैन बांधव-भगिनींना महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीरांनी समाजात

प्रचलित असलेल्या अनिष्ट प्रथांविरुद्ध आवाज उठवला आणि उत्तम जीवनाचा मार्ग दाखवला असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनीही महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महावीर जयंती, तीर्थंकर भगवान महावीरांचे जीवन कार्य तसेच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया या शिकवणीचे स्मरण करून देते. त्यांच्या आदर्श विचारांचा प्रभाव आजही भारतीय जनमानसावर दिसून येतो. अस राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. सकल जैन समाजाच्या वतीनं धारशिव जिल्ह्यात काल महावीर जयंती निमित्त शोभायात्रा काढण्यात आली होती.

**<u>आदिवासी खेलो इंडिया</u>**

छत्तीसगड मधल्या रायपूर इथं सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धांमध्ये काल मैदानी स्पर्धा पार पडल्या. यामध्ये पुरुषांच्या 5 हजार मीटर शर्यतीत महाराष्ट्राच्या गोविंद पाडेकर याने सुवर्णपदक जिंकलं; तर सूरज माशी याने रौप्य पदक मिळवलं. महिलांच्या गटात अरुणाचल प्रदेशाने बाजी मारली, तर कुस्ती स्पर्धेत कर्नाटक संघाचे वर्चस्व राहिलं. संध्याकाळच्या सत्रात पाऊस पडल्यानं नियोजित सामने रद्द करावे लागले.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या काही भागात काल अवकाळी पाऊस पडला; तर पुण्यासह काही ठिकाणी गारपीटही झाली. या पावसाने अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं असून जनजीवनही विस्कळीत झालं. जालना जिल्ह्यात वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला.

पुणे, अहिल्यानगर, कोल्हापूर, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, बीड, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्यात काल जोरदार पाऊस झाला. नाशिक जिल्ह्यातील निफाड, सिन्नर, चांदवड आणि येवला तालुक्यांमध्ये गारपिटीमुळे टरबूज, द्राक्ष आणि आंब्यांच्या बागांचं नुकसान झालं.

जळगाव जिल्ह्यातही अवकाळी पावसामुळे काढणीला आलेला गहू, ज्वारी, मका आणि हरभरा या पिकांचं मोठं नुकसान झालं. येत्या 3-4 दिवसात राज्याच्या सर्वच भागात पावसाचा अंदाज असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.